
सह्याद्रीतले उंचीवरचे टापू म्हणजे मेघांचं साम्राज्य असलेले स्वर्गीय प्रदेश! कुसवडंही त्यातलंच एक!

साताऱ्याच्या पश्चिमेला वीसेक किलोमीटर गेलं की ही जादुई दुनिया सुरू होते. जांभ्याचे सपाट कातळ, मधूनच थोडीफार अंजनी, दातपाडी, भोमा आदी झाडी, पर्वत कस्तुराचं सुरेल गाणं आणि ढग आणि ढग– हे सह्याद्रीतलं अगदी कॉमन दृश्य! चाळीस–पन्नास फुटांच्या पलीकडलं दिसणार नाही इतके दाट ढग आणि प्रचंड गारवा. पाऊस पडत असो वा नसो, ढग असतातच. पाऊस असला तर केवळ वीस फुटांपर्यंतचं चित्र स्पष्ट दिसतं. रस्त्याला रस्त्यापेक्षा 'ओढा' म्हणणं जास्त बरं. चालक सराईत नसेल तर इकडे येण्याची हिंमतही न केलेली बरी. तर या सगळ्यात आम्हाला एखादं फूल फुललेलं दिसतं आणि ते बघायची धमाल धांदल सुरू होते. दार जरा उघडायचा अवकाश की थंड हवेचा झोत पावसासहित आत शिरणार... दार आपोआपच बंद होतं. मग स्वतःला पूर्ण पॅक करून, जॅकेट–मफलर–कानटोपी, त्यावर रेनकोट, शिवाय छत्री... असं सगळं वापरूनच गाडीबाहेर येणं शक्य होतं. तरीही हुडहुडी भरतेच. त्या फुलापाशी पोचून कॅमेरा बाहेर काढेपर्यंत वाऱ्याचा वेग अजूनच वाढतो. त्यामुळे छत्री सावरणं, कॅमेरा भिजू न देणं, फुलाला वारा लागू न देणं इत्यादीच्या गडबडीत आम्ही थोडे तरी भिजतोच. परत जाऊन कधी एकदा गाडीत बसतोय असं होतं. पण तेवढ्यात अजून दोन गोष्टी दिसतात. मग धावतच इकडे–तिकडे करून शेवटी पटकन गाडीत शिरतो... हुश्श! इथला हा गारवा, ढग... सगळं कसं जादुई वाटतं... मजल–दरमजल करत कुसवडं येतं. गाडी मुख्य रस्त्यावरच लावून आत एखादा किलोमीटर चालतच जावं लागतं. परंतु हे फक्त पावसाळ्यातच. एरवी गाडी आत जमिनीपर्यंत जाते. अति पावसाच्या प्रदेशातील हे ऋतूनुसार होणारे बदल मला विलक्षण वाटतात. तर ही जमीन म्हणजे जिथे आमचा निसर्ग पुनरुज्जीवनाचा एक प्रकल्प गेल्या सहा वर्षांपासून सुरू आहे. मग परत एकदा बाहेर पडायची तयारी. आता तर हातात जेवणाचे डबे, कपड्यांची पिशवी असलं सामानही असणार. चालण्याची दिशा पश्चिमच असल्याने सगळा पाऊस, वारा समोरूनच आपटणार. त्यामुळे छत्री पूर्ण वेळ समोर धरूनच चालावं लागतं. नवीन असताना तर आम्ही एकदा चुकून एका टेकाडावरच गेलो. ढग जरा विरळ झाले तेव्हा लक्षात आलं की वाट वेगळीकडेच आहे. पावसाळ्यात जूनपासून ऑक्टोबरपर्यंत होत जाणारे बदल या वाटेवर छान दिसतात. दर वर्षी साधारण एकाच क्रमाने होत जाणारे हे बदल प्रत्येक वेळी पाहायला मजाच येते.

जूनमध्ये पहिल्या पावसाच्या माऱ्यामुळे माती थोडी वाहत जाऊन बारीक दगडांच्या छोट्या छोट्या ओळींमुळे अडते. त्याबरोबर गवताचं बीदेखील अडतं आणि किंचित जास्त माती साचलेल्या छोट्या छोट्या पुंजक्यांमध्ये गवताचं पहिलं बी रुजतं आणि बारीक हिरव्या ओळी दिसू लागतात. ही अगदी पहिल्या सरीची खूण. याच काळात टेरिस नेचेही हिरवं व्हायला सुरुवात झालेली असते. मूळचं जंगल कापलं गेलं की हे नेचे फोफावतं आणि त्या ऱ्हास झालेल्या मोकळ्या प्रदेशात टिकूनही राहतं. रंगीत नाकतोडे ताजेतवाने होऊन टणाटण उड्या मारून दचकवत असतात. भू–अमरींची (ग्राऊंड ऑर्किड्स) पानं जमिनीसरशी वाढलेली असतात. बाजूलाच



केतकी घाटे

# स्वर्गीय सह्याद्री


निसर्गातील लाखो सजीवांपैकी माणूस हा एक. माणसांशिवायच्या सजीवांमध्ये आहेत– प्राणी, पक्षी, झाडं... या सजीवांना माणसासोबत किती आनंद मिळतो हे सांगणं अवघड, पण माणसाला या सजीवांना न्याहाळून, त्यांच्याबद्दल बोलून आनंद मिळतो हे नक्की. या आनंदाचा भाग म्हणून सह्याद्रीच्या कुशीतल्या कुसवडं भागातल्या निसर्गाची झलक दाखविणारा हा अनुभवपर लेख लिहिला आहे पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या केतकी घाटे या तरुणीने.

आपल्या पलीकडच्या निसर्गाच्या निरीक्षणातून मिळणारा हा आनंद माणसाला उर्वरित सृष्टीबद्दल आत्मीयतेने वागण्यासाठीही प्रेरित करू शकतो.

असणाऱ्या उतारावरच्या रानातून गोगी पक्ष्याची शीळ ऐकू येत असते. पर्वत कस्तुराला इकडे गोगी म्हणतात. तो खडकावर बसून खेकडे खात असतो. शेजारच्या तीव्र उतारावरून सुटून आलेले हे मोठाले खडक या परिसराला एक वेगळीच शोभा देतात आणि प्राणी-पक्ष्यांना आसराही.

जुलैमधे हेच गवत थोडं वाढलेलं असतं आणि सगळं पठारच हिरवं झालेलं असतं. काही ऑर्किड्स फुललेली असतात. नाकतोडे, गोगी, पोत्या असतातच. इथे या दिवसांत पोत्या नावाचा कडकडून चावणारा एक किडा अवतरतो. आम्ही म्हणतो, की ते एकदम खूप आले की त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी नृत्यच करावं लागतं- पोत्या नृत्य!

जमिनीला जुलैपासून उफाळे फुटतात. त्यामुळे पाणथळ जागा तयार होऊन अनेक पाणवनस्पतीही उगवून येतात. त्या फुलतात काही ठिकाणी. जिथे मातीत हवेशीरपणा कमी असतो तिथे कीटकभक्षी वनस्पती उगवून येतात. त्या खरंच कीटक पकडत आहेत का, कसा पकडतात हे निरीक्षण करण्यात, त्यांच्या शेजारी बोट धरून प्रयोग करण्यात, त्यांच्यावरच्या अत्यंत सुंदर दिसणाऱ्या चिकट ग्रंथींचे जवळून फोटो काढण्यात बराच वेळ जातो. हे सगळं संपवून जरा पुढे जातो तोच खडकांवरचे युट्रिक्युलारिया लक्ष वेधून घेतात. सुंदर पांढरी-जांभळी नाजूक फुलं असलेली जेमतेम एक इंची कीटकभक्षी वनस्पती. ही मुळांवर असलेल्या फुग्यांद्वारे कीटकभक्षण करते. तिच्याबरोबरच काही बेगोनिया या खडकावर





असतात. चालता चालता त्याचं एखादं पान खुडून तोंडात टाकण्याचा मोह आवरत नाही. ही आंबट पानं आमटीत चवीसाठी घालतात. जुलैतच फुलणारी आणखी एक इंटरेस्टिंग वनस्पती म्हणजे नागमणी. या वनस्पतीचा आसराही (हॅबिटॅट) मोठा वैशिष्ट्यपूर्ण. जांभ्या दगडांमधे तयार होणाऱ्या छोट्या छोट्या गुहांमधे अथवा खोबणींमध्ये ही चार-सहा इंची वनस्पती दिसते. नागाच्या फणीचा आकार असणारा हिचा फुलोरा मोठा सुंदर दिसतो. हिची पानंही अशीच सुरेख वाटोळी... तर अशा या खडकांवर इतक्या वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती उगवत असतात की त्यांना दुर्लक्षित करून पुढे जाताच येत नाही.

ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये रानफुलांची संख्या वाढत जाते. भू-अमरींनाही फुलं येतात. यांच्यातल्या काहींना तर अगदी हात-पाय वाटावेत अशा आकारात फुलं येतात. या आहेत आमच्या जमिनीवरच्या पऱ्या! काही पऱ्यांना लांब शेपूटही असतं. अशाच एका लांब शेपटीच्या ऑर्किडची मोठी गमतीदार गोष्ट आहे. हे ऑर्किड आहे मादागास्करच्या जंगलातलं. त्या फुलाचा एक शेपूटसदृश भाग असतो जवळजवळ सोळा ते सतरा इंच! हे फूल बघून डार्विनने असं अनुमान केलं होतं, की या फुलाचं परागीभवन करणारा एखादा लांब सोंडेचा पतंग असणार. डार्विनच्या उत्क्रांतिवादाला अत्यंत साजेसं असं हे अनुमान. पण ते सिद्ध झालं त्याच्या मृत्यूनंतर एकवीस वर्षांनी. फिल डेरीन या अमेरिकन शास्त्रज्ञाने हे शोधून काढलं आणि या विस्मयकारक परागीभवनाची एक फिल्म तयार केली. ती आपण आजही इंटरनेटवर पाहू शकतो. या नवीन शोधामुळे या फुलाचं नाव पडलं 'डार्विन्स ऑर्किड'! उत्क्रांतीच्या दुनियेत ही घटना अत्यंत साजरी करण्याजोगी मानतात. हे सगळं कळल्यावर आपणही या 'हॅबेनॅरिया लाँगीकॉर्नीक्युलारा'चं असंच रात्री निरीक्षण करावं असं मनात येतं.


सप्टेंबरमध्ये तर वरच्या पठाराचं चित्रच पालटतं. सर्वत्र पांढरा-जांभळा, तांबडा, गुलाबी रंग. कातळाला जणू काही रंगीत जिवंतपणाच येतो. एरवी काळे-हिरवे असणारे हे कातळ असे काही सजतात की त्यांचा डोळे भरून आस्वाद घेतल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. परत एकदा


ठिकठिकाणी गाडी थांबवून वेगवेगळ्या कोनांतून फोटो काढणं सुरू होतं. फोटो काढून झाले तरी मन काही भरत नाही. तिथून पायच निघत नाही. गारवा, पाऊस जरा कमी असल्याने फुलांसोबत जास्त काळ राहणं आनंददायी होतं. या पठारावर अनेक मोसमी तळी तयार होतात. त्यात जास्त उंचीवरच आढळणाऱ्या काही वैशिष्ट्यपूर्ण पाणवनस्पती आढळतात. या उथळ पाण्यातले विविध मासे, शैवाल, पाणकीटक बघण्यात वेळ खूप छान जातो. सुरुवातीच्या काही वर्षांत मात्र आमचा बराच वेळ इथल्या परिसंस्थेविषयी विविध अनुमानं लावण्यात, तिच्या नैसर्गिक अनुक्रमाविषयी, त्यात असणाऱ्या मानवी हस्तक्षेपाविषयी, परिसंस्थेवर त्याच्या होणाऱ्या परिणामाविषयी चर्चा करण्यात गेला. कोणत्याही प्रदेशाचा इतिहास जाणून घेऊन, सध्याच्या नैसर्गिक स्थितीचं अर्थपूर्ण महत्त्व जाणणं आणि तो मानवी हस्तक्षेपापासून दूर राखला तर त्याचं भविष्य काय असेल हे जोखणं, हा आमचा मनोरंजनाचा विषय. जेव्हा या सगळ्याची नीट शास्त्रीय उत्तरं मिळाली तेव्हा सुरू झालं इथल्या प्रत्येक जीवाकडे कुतूहलाने बघणं, त्याचं कार्य जाणून घेणं. तज्ज्ञांशी बोलून तर यातल्या अनेक गोष्टी अजूनच वेगळ्या दृष्टिकोनातून बघता आल्या. सगळं समजून-उमजून झाल्यावर आमच्यातला आस्वादक जागा झाला. त्या आरस्पानी तळ्यांजवळ नुसतं बसून राहावं, फुलं बघत राहावं... या वातावरणात एक वेगळाच उत्साह, आनंद असतो. मधेच एखादी हलकी पावसाची सर आणखी बहार आणते. पोस्ट-मॉन्सून हा सीझनच उत्तम! सगळी झाडं कशी निश्चिंतपणे प्रकाश संश्लेषण करत असतात. भरपूर पाणी, भरपूर सूर्यप्रकाश... कशात उगाच काटकसर करावी लागत नाही. उपलब्ध सत्त्वं वापरून लगेच फुलतातही. कीटकांशी मैत्री करायलाही उत्सुक... त्याकरता किती रंग, किती गंध, किती नखरे त्यांचे! पांढरे एरिओकोऑन, जांभळे युट्रिक्युलारिया, गुलाबी तेरडे (बाल्सम), पिवळे सोनकी... कातळांवर एक सुरेख गालिचा अंथरलाय असं वाटतं. या दृश्याचं काय करू अन् काय नको असं होतं. शांत बसून पाहत राहावं की चित्र काढावं? की फोटो काढावेत? या छोट्या वनस्पतींची बुद्धिमत्ताही भारी. प्रतिकूल परिस्थिती येणार हे ओळखून, आहे तेवढ्या वेळातच परागीभवन करवून घेऊन बिया तयार करतात. तिथेच आडव्या होतात. एका पिढीचा अंत होतो. परंतु बियांच्या रूपातली पुढची पिढी वाट पाहते पुढच्या पावसाची.

हेच सगळं नाट्य जरा कमी प्रमाणात आमच्या प्रकल्पाच्या वाटेवरही दिसतं. वाटेत एक मोठं जुनं खाचर आहे तिथे जरा खोलवा असल्याने पाणी जरा जास्त साचतं. तिथे पाणवनस्पती जास्त प्रमाणात आढळतात. इथून पुढे एक छोटं टेकाड चढलं की हमखास भेटतो कांबळं पांघरलेला एक गुराखी आणि त्याचे दोन बैल. त्याच्याशी पावसाविषयी गप्पा मारून पुढे जायचं. मग येते जमिनीची हद्द.


परंतु हाच सगळा अनुभव ऑक्टोबरनंतर अत्यंत झपाट्याने बदलत जातो. सप्टेंबरमधे सहा इंच उंच असलेलं गवत ऑक्टोबरमध्ये केवळ पंधराच दिवसांत एक-दीड मीटर उंच होऊन फळं तयार करून, परागीभवन होऊन बीदेखील तयार करतं. गावातले लोक म्हणतात, नवरात्रात गवत रोज एक कांडी, वनस्पतीशास्त्रीय भाषेत एक पेर (नोड-इंटरनोड) वाढतं. नऊ कांड्या झाल्या की बी धरतं. या महिन्यात जमिनीवर खूप मोठा जैवभार (बायोमास) आहे असं जाणवतं. चालतानाही गवत बाजूला सारत पुढे जावं लागतं.

नोव्हेंबरमधे हे गवत जरा वाळायला सुरुवात होते. हा सीझन म्हणजे पिसवांचा (टिक). अत्यंत बारीक असे हे किडे





**वेगवेगळ्या ऋतूंमध्ये आढळणारं सह्याद्रीचं मनमोहक निसर्गसौंदर्य !**



अंगावर चढतात, चावतात आणि अनेक दिवस हे डाग खाजत राहतात. परंतु याचा विसर पडावा याकरता अनेक गोष्टी आजूबाजूला दिसत राहतात. त्यातलीच एक म्हणजे 'कुडा' ही वनस्पती. फिकट वासाच्या या फुलांची भाजी करून खाल्ली जाते. सुंदर पांढऱ्या फुलांचे घोस तळपत्या उन्हात दिलासा देतात.

डिसेंबर ते फेब्रुवारी कोरडेपणा वाढत जातो, तापमान वाढत जातं; परंतु मनाला भुरळ घालणारे अनेक बदल होत असतात. हा सीझन आहे इथल्या झुडपांच्या बहरण्याचा. डिसेंबर ते फेब्रुवारी अनुक्रमे दातपाडी, डिंगळा, भोभा, बामणी व धायटी ही झुडपं फुलतात. खरं तर या परिसरातले सध्याचे राजे हेच. या झुडपांचं वर्चस्व वृक्षांपेक्षाही जास्त. त्यामुळे ही झुडपं फुलली की कीटकांची संख्याही खूप वाढते. कुणाला सुगंध अधिक प्रमाणात तर कुणाकडे मकरंद अधिक प्रमाणात. पाठोपाठ जानेवारी ते एप्रिलपर्यंत सुरू होतो वृक्ष फुलण्याचा काळ. निळ्या मोहक फुलांची अंजनी, गुबगुबीत पांढरट फुलांचा पिसा, नाजूक फुलांचं पारजांभूळ, घमघमाट वासाचा सईकुडा, घोसांनी लगडलेलं जांभूळ... सगळेच एवढ्या कडकडीत उन्हाळ्यात अशा काही उमेदीने फुलतात की किंचितशा श्रमाने घाम गाळून मटकन खाली बसणाऱ्या माणसाला लाजच वाटावी. एप्रिल-मे हे महिने मात्र खास रानमेव्याचे. जांभूळ, करवंद, आंबटगरा, ओवळी, वशेंकी... प्रत्येकाची चव वेगळी. सूर्याचा पारा कितीही चढला तरी प्रत्येक झाळीतली वेगवेगळ्या चवीची करवंदं चाखण्याची ओढ काही कमी होत नाही. करवंदं चाखत जमिनीच्या हद्दीपर्यंत पोचेस्तोवर सूर्य डोक्यावर आलेला असतो.

सूर्य जरा कलला की वातावरण जरा आल्हाददायक होतं. चूल पेटवून चहा केला जातो. एक चक्कर मारून परत येईपर्यंत सूर्य मावळतीला असतो. संधिप्रकाशात जमिनीचं सौंदर्य फारच खुलतं. अशा वेळी एखाद्या उंच खडकावर उभं राहिलं तर अख्खं पठार आणि बाजूचा उतार दोन्ही फारच विलोभनीय दिसतं. त्याच वेळी जमीन राखल्याचं महत्त्व कळतं, दिसतं. प्रकल्पाच्या जमिनीव्यतिरिक्तचा भाग अगदी कोरडा, भगभगीत वाटतो. गवतही शिल्लक नसलेला. नावापुरत्या झुडपी-झाळ्या मात्र असतात आणि जमिनीवर मात्र बहुवर्षीय गवताचं आच्छादन दिसतं. झुडपांची दाटीही बरीच जास्त. आता हवेतला गारवा अचानक बराच वाढलेला असतो. इतका, की एखादं जॅकेट चढवावं लागतं. रात्रीपर्यंत अख्खा प्रदेश थंडगार होतो. अंगावर तीन-चार पांघरुणं घेतली तरी ऊब येत नाही एवढी थंडी पडते. जणू हिवाळ्याचेच दिवस असल्याच्या थाटात कानटोपी, पायमोजे घालून झोपावं लागतं. केवढं हे विषम तापमान! हे तर काही वाळवंट नव्हे... मग तरीही? मूळचं दुय्यम सदाहरित जंगल टिकलं असतं तर एवढं विषम तापमान कधीच झालं नसतं. अहो, ते परत मिळवण्यासाठीच तर हा सगळा आटापिटा. खरं तर हा आटापिटाही कमीत कमी करण्याकडे आमचा कल. निसर्गाला फक्त योग्य प्रमाणात योग्य



ठिकाणी मदत करावी आणि होणाऱ्या बदलांची मजा घ्यावी.. एकदा ऊब आली की डोळा कधी लागतो ते कळतही नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या कोवळ्या उन्हात परत एकदा सर्वेक्षणाकरता एक फेरफटका. भूभागात, मातीत, सूक्ष्म हवामानात, झाडां-पानांत, पशुपक्ष्यांत, विविध आसऱ्यांत आमच्या या तथाकथित प्रयत्नांमुळे काय फरक पडला याच्या नोंदी केल्या जातात. खरं तर या नोंदी केल्या नाहीत तरी निसर्ग आपलं अंतिम ध्येय गाठणारच आहे. पण मग आमचा छंद कसा जोपासला जाणार साध्या गवताच्या पात्याला शास्त्रीय नावाची किचकट पाटी जोडण्याचा? असो. हे करत करत आम्ही चालत असतो. आणि अचानक जाणवतं, पायांतले जोडे चक्क पूर्ण ओले झाले आहेत- दवांमुळे. उंचच उंच गवत आणि त्याच्या टोकापासून खाली ओघळत येणारं हे दव म्हणजे तर आपली संपत्ती! पैशाऐवजी यालाच जर आपली राष्ट्रीय संपत्ती मानलं तर, असा एक गमतीदार विचार मनात येऊन गेला.

नोंदी पूर्ण होईपर्यंत उन्हाचे चटके जाणवायला लागलेले असतात. आम्ही परत फिरतो. सामानाची आवराआवर करून गाडीत बसेपर्यंत वातावरणाने विषमतेचा दुसरा पल्ला गाठलेला असतो. गाडी परतीच्या वाटेवर असताना फार काहीही काम करायचा उत्साह नसतो.

वरचं पठार तर या ऋतूत मृतवतच भासतं. त्यात ते जाळलंही जातं. जो काय थोडाफार जैवभार तयार होऊन जमिनीला आच्छादन देण्याचा निसर्गाचा प्रयत्न असतो तोही धुडकावला जातो. उरतं ते भयाण राखेचं आणि धुळीचं साम्राज्य. परंतु त्यातही अचानक डोळे चमकतात. फॅन थ्रोटेड गेकोचा मानेवरचा सुंदर चमकणारा पंख / पडदा दाखवत मादीला आकर्षित करत असतो. एखादा लार्क पक्षीही आढळतो. नोंदी करण्यासाठी मी खाली उतरते. जमिनीचं, मातीचं तापमान असतं ५६ अंश सेल्सियस. आता मात्र माझी सहनशक्ती संपलेली असते. आणि म्हणूनच की काय एक वर्षही सरलेलं असतं. काहीच दिवसांत येणार असतात ढग, ढग आणि पाऊस!

◆ केतकी घाटे

मोबाइल : ९८२२६५९८०४

ketki@oikos.in